# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

तारीखः-

## कोटेशन नोटीस

भिवंडी निजामपूर शहर महानगरपलिका महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि२८/०१/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचेकडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सव्र करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत.

---

**अग्निशमन विभागाकडील मनपा वाहन क्र. एमएच-०४-एएम-२०३ (फायर ब्रिगेड) या वाहनाची दुरुस्ती करणे बाबत.**

**१) सिट कव्हर व ड्रायव्हर कॅबिन हुडची दुरुस्ती :-** सर्व प्रथम गाडीचे सर्व जुने सिट काढुन ०३ नग सिट ब्रॅकेट गाडीला व्यवस्थित फिट करुन वेल्डींग व ब्रेझींग करुन नटबोल्टने फिट करुन ०३ नग नविन फ्लॉयवुड, फोम व रेग्झीनचा कपडा वापरुन सिट फिट करणे, ड्रायव्हर कॅबिन मधील जुना हुडचा कपडा व फोम काढुन नविन फोम व्यवस्थित बॉक्स साईटने चिटकुन त्यावर नविन रेग्झीन कपडा लावणे.

**२) वायरिंग, लाईट, हॉर्न, हुटर, सायरनची दुरुस्ती करणे :-** गाडीचे सर्व लाईट (हेडलाईट, टेललाईट, इंडिकेटर लाईट, रुफ लाईट, अंबर लाईट, फॅाग लाईट, रिअर लॅम्प) नविन फिट फिट करुन त्या ठिकाणी वायर कट झाली आहे त्याठिकाणी जॅाईंट करुन वायर टेपींग करणे, काही ठिकाणी नविन वायर व होल्डर फिटींग करुन खराब झालेले सायरन, हुटर व अंबर लाईट नविन फिट करुन नविन फयुज बॅाक्स फिटींग करुन सर्व लाईट व इंडिकेटर, मीटर लाईट चालु करणे.

**३) बॅास पंपची दुरुस्ती :-** १) इंजिनचा टायमिंग घेवुन बॅासपंप बाहेर काढणे. २) बॅास पंपला डिझलने धुवुन डिसमेन्टलिंग करणे. ३) बॅास पंप खराब झालेले फ्लंन्जर नविन फिट करुन नविन फयुल पंप फिट करणे, ०६ नग डिझल पाईप तपासणी करुन खराब झालेला पंप नविन फिट करणे, तसेच नविन डिझल फिल्टर फिट करुन बँन्जो बोल्ट, बँन्जो बोल्ट वॅाशर नविन फिट करुन पुर्ण दुरुस्ती करणे.

**४) दरवाजे लॅाक, हॅण्डल व काचेचे रबर व साईड मिररची दुरुस्ती करणे :-** वाहनाचे चारही दरवाजाचे लॅाक व हॅण्डल खराब झाले असल्याने ते काढुन त्याजागी नविन ०४ नग हॅण्डल व ०४ नग लॅाक फिटींग करणे, दरवाजाचे हिंजेसची सेटींग करुन ड्रायव्हर कॅबिनच्या पुढील काच ०२ नग व ०२ नग काचेचे रबर व साईडचे ०२ नग रबर खराब झाले असल्याने ते काढुन नविन रबर फिटींग करणे, वाहनाच्या दोन्ही साईडचे मिरर खराब झाले असल्याने नविन दोन मिरर फिट करणे.

**५) वायफरची दुरुस्ती :-** वाहनाचे वायफर मशिन पुर्णपणे सर्विसिंग करुन नविन कार्बन ब्रश फिटींग करुन केम रॅाड बदली करणे, तसेच ०२ नग नविन वायफर ब्लेड फिट करणे. सदर दुरुस्ती कामी अंदाजे खर्च रक्कम रु. /- अपेक्षित आहे.

**६) टॅपेट कव्हरची दुरुस्ती :-** वाहनाचे ०६ नग टॅपेट कव्हर खोलुन जुने पॅकींग काढुन डिझेलने टॅपेट कव्हर स्वच्छ धुवुन नविन टॅपेट पॅकींग फिट करणे.

Chaudhari

**वाहन व्यवस्थापक**

**भि. नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.**

---

तारीखः१८/०१/२०१८

खालील ठिकाणी प्रसिध्द केली.

१) मनपा संकेस्थळ